**ठळक बातम्या**

- शिक्षणाला मूल्यं, नीतीमत्ता आणि मानवतेची जोड देणं गरजेचं असल्याचं राज्यपाल रमेश बैस यांचं प्रतिपादन
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या, इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या ऑनलाइन जाहीर होणार
- मुंबईतल्या अनधिकृत पब आणि बारवर कारवाई करण्याच्या सूचना
- घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेप्रकरणी आरोपी भावेश भिंडेच्या पोलीस कोठडीत २९ मेपर्यंत वाढ

  **आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या १७ व्या हंगामाच्या विजेतेपदासाठी थोड्याच वेळात कोलकत्ता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात लढत

**<><><><><>**

शिक्षणाला मूल्यं, नीतीमत्ता आणि मानवतेची जोड देणं गरजेचं आहे, नाही तर शिक्षण फक्त व्यक्तीचा अहंकार वाढवतं, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज मुंबईत केलं. खार इथल्या रामकृष्ण मठ आणि मिशनच्या शताब्दी वर्षाच्या सांगता कार्यक्रमात वांद्र्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात ते बोलत होते. रामकृष्ण मिशननं शाळांशी जोडून घेऊन विद्यार्थ्यांना संस्कारित करावं, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. रामकृष्ण मिशनच्या मुंबई केंद्रानं गरीब आणि वंचित महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम राबवून त्यांना आत्मनिर्भर करावं, असं आवाहनही बैस यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर होणार आहे. मंडळाच्या विविध संकेतस्थळांवर निकाल बघता येईल. गुणपडताळणीसह गुणपत्रिका छायाप्रतींसाठी २८ मे पासून ११ जूनपर्यंत संकेतस्थळावरच ऑनलाइन पद्धतीनं अर्ज सादर करता येईल.

**<><><><><>**

पुण्यातल्या कल्याणीनगरमधल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मुंबईतल्या अनधिकृत पब आणि बारवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. निर्धारित वेळेच्या पुढे सुरू असणाऱ्या पब आणि बारवरही कारवाई करणार असल्याचं शिंदे यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. पुणे अपघात प्रकरणी आपण स्वतः पोलीस आयुक्तांशी बोललो आहोत. कायद्यापुढे सर्वजण समान आहेत. या प्रकरणातल्या सर्व दोषींवर कारवाई होईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><><>**

येत्या पावसाळ्यात मुंबईत कुठंही पाणी तुंबू नये, यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या असून, महापालिका नालेसफाईचं काम युद्धपातळीवर करत असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. ते आज नालेसफाईच्या कामाची पाहणी केल्यानंतर वार्ताहर परिषदेत बोलत होते. मुंबईत ५४ हजार २२५ वाहनांद्वारे गाळ काढण्याचं काम सुरू आहे. हिंदमाता, मीलन सबवे अशा पाणी साचणाऱ्या ठिकाणी ४८२ पंप लावले आहेत. समुद्राचं पाणी भरतीच्या वेळी नागरी भागात घुसून होणारं नुकसान लक्षात घेऊन ७ कोटी लीटर क्षमतेच्या भूमिगत टाक्या बसवल्या आहेत. मिठी नदी, जे. के. मेडिकल, वांद्रे-कुर्ला संकुल, दहिसर

नदी याठिकाणी पाहणी करून नाले पूर्ववत करण्याचा सरकारचा मानस आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

दरड कोसळण्याचा धोका असलेली ठिकाणं निश्चित केली असून,  ती सुरक्षित करण्यासाठी सुरक्षा जाळ्या लावल्या जातील, या भागातल्या रहिवाशांची तात्पुरती व्यवस्था एमएमआरडीएच्या घरांमध्ये केली जाईल, असं ते म्हणाले. रेल्वे हद्दीतली स्वच्छता आणि पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची डागडुजी केली जाईल, नागरिकांनी आपल्या भागात राडारोडा किंवा कचरा असेल तर त्याचे फोटो महापालिकेच्या हेल्पलाइन क्रमांकावर पाठवावेत, तो स्वच्छ केला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातील सर्व अकृषी वीज ग्राहकांचे सध्याचे वीजमीटर बदलून लवकरच स्मार्ट मीटर लावण्यात येणार आहेत. राज्यात कृषिपंपांच्या वीजजोडण्या वगळता महावितरणच्या सर्व लघुदाब वर्गवारीतील दोन कोटी ४१ लाख वीजग्राहकांकडे हे स्मार्ट मीटर मोफत लावण्यात येणार आहे. यामुळं सध्याच्या पारंपरिक मीटरचे रीडिंग घेणं, वीजबिल तयार करणं आणि ते वितरीत करणं बंद होणार आहे. रिचार्ज करण्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइनचे सर्व पर्याय खुले राहतील. मीटर रिचार्ज केल्यानंतर वीजपुरवठा सुरु होईल. यामुळे ग्राहकसेवा आणखी तत्पर होणार असल्याचं, महावितरणनं कळवलं आहे.

**<><><><><>**

प्राप्तिकर विभागानं आज देशातल्या जवळपास २० ठिकाणी शोधमोहीम राबवली. त्याअंतर्गत नाशिकमधल्या एका सराफा दुकानातही छापा टाकण्यात

आला. या छाप्यामध्ये २६ कोटी रुपयांची रोकड आणि ९० कोटी रुपयांच्या बेहिशोबी मालमत्तेचे दस्तऐवज जप्त केले असल्याची माहिती प्राप्तिकर विभागानं दिली आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेप्रकरणी अटकेत असलेला आरोपी भावेश भिंडे यांच्या पोलीस कोठडीत महानगर दंडाधिकारी न्यायलयानं २९ मेपर्यंत वाढ केली आहे. भिंडे याला १६ मे रोजी राजस्थानमधल्या उदयपूर इथं पोलिसांनी अटक केली. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत आज संपल्यानं त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. भिंडे याच्या फर्मनं शहरात लावलेल्या इतर होर्डिंग्सप्रकरणी चौकशी करायची असल्यानं त्याच्या कोठडीत वाढ करण्याची विनंती पोलिसांनी न्यायालयाला केली.

घाटकोपर इथं १३ मे रोजी झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या १७ व्या हंगामाच्या विजेतेपदासाठी आज कोलकत्ता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात लढत होणार आहे. चेन्नईतल्या एम.ए. चिदंबरम स्टेडिअमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

क्वालालंपूर इथं झालेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधू हिला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. चीनच्या वांग झी यी हिनं

सिंधूवर १६-२१, २१-५, २१-१६ अशी मात करत विजेतेपद पटकावलं.

**<><><><><>**

लोकसभेच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. विविध राजकीय पक्षांच्या दिग्गज नेत्यांनी आज आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशात मिर्झापूर, 'मऊ' आणि बासगाव इथं सभा घेतल्या. कल्याणकारी हेतू आणि उद्दिष्टांमुळे देशातल्या नागरिकांनी पुन्हा एकदा भाजपाप्रणित रालोआ सरकारला निवडून देण्याचं ठरवलं असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग आणि वंचित घटकांसाठी असलेलं आरक्षण धर्माच्या आधारे कुठल्याही समुदायाला दिलं जाणार नाही, असा पुनरुच्चारही प्रधानमंत्र्यांनी केला.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज हिमाचल प्रदेशात नाहन इथं प्रचारसभा घेतली. ही पहिलीच निवडणूक आहे जिथे काँग्रेसला संविधानाच्या रक्षणासाठी लढावं लागत आहे, असं ते यासभेत म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत केवळ २२ जणांचं १६ लाख कोटी रुपये इतकं कर्ज माफ केलं, पण मागच्या वर्षी हिमाचल प्रदेशात अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या आपत्तीच्या काळात त्यांना केवळ ९ हजार कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देता आलं नाही, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

राज्यात विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या होणार असलेल्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल दोन उमेदवारांची घोषणा केली. मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून जे. एम. अभ्यंकर यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

गुजरातच्या राजकोट शहरात गेमिंग झोनला काल संध्याकाळी लागलेल्या आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांचा आकडा २७ वर पोहोचला आहे. यात ९ लहान मुलांचाही समावेश आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची घोषणा केली. या दुर्घटनेच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. गुजरात उच्च न्यायालयानं या घटनेची स्वतःहून दखल घेतली आहे. याची सुनावणी उद्या होणार आहे.

**दिल्लीतल्या** विवेक विहार परिसरातल्या काल एका बाल रुग्णालयाला लागलेल्या आगीत ६ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला. एक बाळ आयसीयूमध्ये असून पाच बालकांवर अन्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**उत्तरप्रदेशात** शाहजहानपूर इथं काल रात्री भाविकांना घेऊन जात असलेल्या बसचा अपघात होऊन, अकरा जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले.

**काश्मिरच्या** कुलगामा खोऱ्यात निपोरा इथं काल संध्याकाळी प्रवासी वाहन रस्त्यावर घसरून झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला.

या दुर्घटनांबद्दल राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पाऊस आज बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य, मध्य आणि ईशान्येतल्या काही भागांमध्ये पुढे सरकला. विदर्भ आणि लगतच्या भागावरची चक्रीय परिस्थिती विरून गेली आहे. पुढचा आठवडाभर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. विदर्भात २९ मेपर्यंत उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//